**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५ )**

**गुरुवार दिनांक २१ मे २०२६**

**ठळक बातम्या..**

1. **पावसाच्या अंदाजानुसार खरीप पिकांचं नियोजन आणि जलयुक्तशिवारची कामं पूर्ण करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश**
2. **मुंबईत आज भारत आणि सायप्रसदरम्यान सहा सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या**
3. **गडचिरोली नजीकच्या मुरखळा -नवेगाव वळणावर बस उलटून ७ महिन्यांच्या बाळासह तीन प्रवाशांचा मृत्यू; ३३ जखमी**
4. **23 मे पर्यंत अकोला,अमरावती आणि वर्धा जिल्ह्यात उष्णतेच्या लाटेचा रेड अलर्टआता**

---

**खरीप हंगाम पूर्व आढावा बैठक**

राज्यस्तरीय खरीप हंगाम पूर्व आढावा बैठक आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत मुंबईत पार पडली. शेतकऱ्यांना बँकांकडून सहज कर्ज उपलब्ध करून देण्याबाबत तसंच बँकांनी शेतकऱ्यांना सिबिल स्कोर न विचारण्याबाबत सूचना देण्यात आल्याची माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली. याशिवाय पावसाच्या अंदाजानुसार खरीप पिकांचे नियोजन आणि त्यासाठी जलयुक्तशिवारची कामे पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहे असंही त्यांनी सांगितलं.

***(होल्ड बाइट - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस 28 सेकंद )***

यंदाच्या खरीप हंगामावर ‘एल-निनो’चे सावट असणार असून, याचा सर्वाधिक फटका पश्चिम विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्राच्या काही भागांना बसेल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. राज्यात खरिपाचे क्षेत्र हे १५२ लाख हेक्टर आहे. राज्याला २०.१६ लाख मेट्रिक टन बियाणांची आवश्यकता असताना तब्बल २८ लाख मेट्रिक टन बियाणे उपलब्ध आहे. हे सर्व बियाणे प्रमाणित असावे आणि शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये, यासाठी 'साथी' पोर्टल तयार करण्यात आलं असून या पोर्टलवरील प्रमाणित बियाणेच विकत घेण्याचा आग्रह शेतकऱ्यांना केला जात आहे, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं .

---

**भारत-सायप्रस बिझनेस फोरम**

सायप्रसच्या उद्योगसमूहांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करावी असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. मुंबईत आयोजित सायप्रस भारत बिझनेस फोरमच्या कार्यक्रमात ते बोलत होते. महाराष्ट्र हे 660 अब्ज डॉलर्स अर्थव्यवस्थेचे राज्य असून देशाच्या औद्योगिक उत्पादनात सुमारे 30 टक्के आणि परकीय गुंतवणुकीत 40 टक्के वाटा राज्याचा आहे, असं त्यांनी सांगितलं. मुंबई हे जगातील वेगाने विकसित होणारे आर्थिक केंद्र बनत असून आंतरराष्ट्रीय एज्यु सिटी, मेडी सिटी आणि जीसीसी सिटी सारखे जागतिक दर्जाचे प्रकल्प राज्यात उभारले जात असल्याची माहिती फडणवीस यांनी दिली.भारतीय उद्योगांना केवळ युरोपच नव्हे तर पूर्व भूमध्य सागरी, आखाती आणि उत्तर आफ्रिकेतल्या देशांची बाजारपेठ खुली करून देण्यासाठी सायप्रस साहाय्य करेल अशी ग्वाही सायप्रसचे अध्यक्ष निकोस क्रिस्टोदौलीदेस यांनी दिली. मुंबईत येत्या १ सप्टेंबर पासून सायप्रस व्यापार केंद्र सुरु करण्याची घोषणा निकोस यांनी यावेळी केली. सायप्रसकडे सध्या युरोपीय महासंघाच्या परिषदेचे अध्यक्षपददेखील आहे..

-----------------------------------------

**जिल्हा अध्यक्ष नियुक्ती**

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने महाराष्ट्रातील जिल्हा काँग्रेस समित्यांच्या पुनर्रचनेला मंजुरी देत नव्या जिल्हाध्यक्षांची घोषणा केली आहे. संघटन मजबूत करण्याच्या उद्देशाने “संगठन सृजन अभियाना" अंतर्गत हा निर्णय घेण्यात आला. पक्षाध्यक्षांच्या मंजुरीनंतर के सी वेणूगोपाळ यांनी यासंदर्भातील पत्र जारी केलं. त्यानुसार काँग्रेसचे नागपूर शहराध्यक्ष म्हणून प्रफुल्ल गुडधे पाटील यांची तर अमरावतीच्या शहराध्यक्षपदी बबलू शेखावत यांची निवड झाली आहे. अकोला शहराध्यक्ष म्हणून महेंद्र गवळी, अकोला ग्रामीण मध्ये प्रकाश तायडे, चंद्रपूर शहराध्यक्ष म्हणून शिवा पोलीसेटी तर चंद्रपूर ग्रामीणच्या अध्यक्षपदी सुभाष धोटे यांची निवड झाली. वर्धेच्या जिल्हाध्यक्षपदी सुनील कोल्हे, वाशिमच्या जिल्हाध्यक्षपदी विठ्ठल चौधरी आणि यवतमाळचे काँग्रेस जिल्हाध्यक्ष म्हणून सचिन नाईक यांची निवड झाली आहे तर गडचिरोलीत युवक काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव ॲड. विश्वजित कोवासे यांची काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

-----------------------------------------

**“रोजगार मेळा”**

केंद्र सरकारच्या “रोजगार मेळा” अभियानांतर्गत १९वा रोजगार मेळा शनिवार, २३ मे रोजी सकाळी १० वाजता नागपुरातील नॅशनल फायर सर्विस कॉलेज येथे आयोजित

करण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी सकाळी ११ वाजता व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे कार्यक्रमाचं उद्घाटन करतील. देशभरातल्या ४७ शहरांमध्ये एकाच वेळी रोजगार मेळा होणार आहे. दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, मंडळाच्या वतीने आयोजित या मेळाव्यात रेल्वे, टपाल, संरक्षण आणि आरोग्य विभागातील ३१५ निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात येणार असून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहेत.

-----------------------------------------

**नीट पेपरफुटी**

नीट पेपरफुटी प्रकरणी सीबीआयने लातूरचे बालरोगतज्ज्ञ डॉ. मनोज शिरुरे यांना ताब्यात घेतलं आहे. लातुरातल्या शिरुरे यांच्या रुग्णालयात जाऊन यापूर्वी सीबीआयने कसून चौकशी केली होती. नंतर गेले दोन दिवस पुण्यात झालेल्या तपासानंतर शिरुरे यांना अटक केल्याचं आमच्या वार्ताहाने कळवलं आहे. दरम्यान नीट-युजीची परीक्षा आता २१ जून रोजी होणार असल्यानं राज्यातल्या अभियांत्रिकी आणि फार्मसी महाविद्यालयांच्या प्रवेश प्रक्रिया पुढे ढकलली असल्याची माहिती राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

-----------------------------------------

**राजीव गांधी पुण्यतिथी**

माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. त्यानिमित्त दहशतवादविरोधी दिनही आज पाळला जात आहे. दहशतवाद आणि हिंसाचार विरोधी दिनानिमित्त आकाशवाणी, महावितरण आदी आस्थापनांमध्ये तसंच विद्यापीठांमध्ये सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी देशात शांतता, सामाजिक एकोपा आणि सामंजस्य टिकवून ठेवण्याची सामूहिक प्रतिज्ञा घेतली.

-----------------------------------------

**गडचिरोली बस अपघात**

गडचिरोली येथून उमरखेडला जाणारी राज्य परिवहन महामंडळाची बस गडचिरोलीनजीकच्या मुरखळा-नवेगावच्या वळणावर उलटल्याने तीन प्रवाशांचा मृत्यू झाला, तर ३३ जण जखमी झाले. मृतांमध्ये सात महिन्यांच्या बाळाचाही समावेश आहे. आज सकाळी साडेसात वाजताच्या सुमारास ही घटना घडली. ख्वाजा शहाबुद्धीन वय ५८ वर्षे , शिवांश स्वप्नील नवघरे वय ७ महिने, आणि लक्ष्मीबाई रामदास दुर्कीवार वय ५५ वर्षे अशी मृतांची नावे आहेत. मूल मार्गावरील मुरखळा-नवेगावच्या वळणावर चालकाचे नियंत्रण सुटल्याने बस रस्त्याच्या कडेला असलेला

लोखंडी कठडा तोडून खाली उलटली. नागरिक आणि पोलिसांनी जखमींना बाहेर काढून जिल्हा सामान्य रुग्णालयात भरती केलं . तिथं उपचारादरम्यान तिघांनी प्राण सोडला.

-----------------------------------------

**अपघात**

अमरावती-मुंबई राष्ट्रीय महामार्गावर लोणी परिसरात आज दुपारी झालेल्या भीषण अपघातात दुचाकीस्वार इसमाचा मृत्यू झाला. ४० वर्षे नोशाद कुरेशी आपल्या दुचाकीने महामार्गावरून जात असताना लोणी गावाजवळ मागून आलेल्या भरधाव कारने त्यांच्या वाहनाला जोरदार धडक दिली असता त्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला.

-----------------------------------------

**पुनरीक्षण कार्यक्रम**

यवतमाळ जिल्ह्यात १ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी विकास मीना यांनी दिली. या कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांची नावे मतदार यादीत समाविष्ट करण तसच मतदार याद्या अधिक अचूक आणि पारदर्शक करण हा उद्देश आहे. या विशेष मोहिमेअंतर्गत ३० जून ते २९ जुलै या कालावधीत बीएलओमार्फत घरोघरी भेटी देऊन प्रगणना करण्यात येणार आहे. ५ ऑगस्ट रोजी प्रारुप मतदार याद्यां प्रसिद्ध करण्यात येईल. ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर या कालावधीत दावे आणि हरकती स्वीकारण्यात येणार आहेत. अंतिम मतदार याद्या ७ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

-----------------------------------------

**मकरंद पाटील**

बुलढाणा जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल आणि गॅस सिलेंडरचा मुबलक साठा उपलब्ध असून नागरिकांनी इंधन टंचाईच्या अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन पालकमंत्री मकरंद पाटील यांनी केलं. जिल्ह्यात दररोज मोठ्या प्रमाणात इंधन पुरवठा होत असून पेट्रोल पंपांवर अनावश्यक गर्दी आणि साठेबाजी टाळण्याच आवाहन प्रशासनाने केलं आहे. शेतकऱ्यांनाही शेतीसाठी आवश्यक इंधन उपलब्ध करून दिले जाणार असल्याच त्यांनी स्पष्ट केल.

-----------------------------------------

**विशेष ब्लॉक**

दक्षिण पूर्व मध्य रेलवे अंतर्गत नागपूर मंडळातील गोंदिया रेल्वे यार्ड इथं पॉइंट परिवर्तन आणि अन्य कामासाठी आज आणि उद्या विशेष ब्लॉक घेण्यात येणार आहे. या कामामुळे गोंदिया स्थानकावरील काही मार्गांवर रेल्वे वाहतूक प्रभावित होणार असून अनेक मेमू प्रवासी गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. गोंदिया-गढ़ा, गोंदिया-झारसुगुडा तसेच रायपूर-डोंगरगढ़ मार्गावरील काही गाड्यांचा यात समावेश आहे. प्रवाशांना प्रवासापूर्वी गाडीची स्थिती तपासण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

----------------------------------------

**सफारी बंद**

मान्सूनच्या पार्श्वभूमीवर तसंच वन्यजीवांच्या प्रजनन काळात पर्यटकांची सुरक्षा आणि जंगलातील रस्त्यांची स्थिती लक्षात घेता पेंच, बोर तसेच उमरेड-पवनी-कऱ्हांडला अभयारण्यात जंगल सफारी १५ जून ते ३० सप्टेंबर या कालावधीत बंद ठेवण्यात येणार आहे. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या निर्देशानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, पर्यटकांसाठी बफर क्षेत्रातील पर्यटन गेटवरून मर्यादित स्वरूपात जंगल सफारीची सुविधा उपलब्ध राहणार आहे.

----------------------------------------

**हवामान**

आगामी 23 मे पर्यंत अकोला, अमरावती आणि वर्धा या जिल्ह्यांमध्ये उच्चांकी तापमानात वाढ होण्याचा अंदाज असल्याने उष्णतेच्या लाटेचा **रेड अलर्ट** जारी करण्यात आला आहे. यादरम्यान नागपूर, यवतमाळ आणि चंद्रपूर या जिल्ह्यांना देखील ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. गोंदिया आणि गडचिरोली इथं येलो अलर्ट राहणार आहे. बुलढाणा आणि वाशिम जिल्ह्यात हवामान सामान्य राहणार असल्याचा अंदाज आहे. आज दुपारी अडीच वाजता मोजलेल्या तापमानानुसार 46.4 दशांश अंश सेल्सिअससह चंद्रपूर जिल्हा सर्वात उष्ण ठरला आहे. तर वर्धा इथं 46 अंश सेल्सिअस, नागपूर इथं 45.6 दशांश अंश सेल्सिअस तर गोंदिया इथं 44.4, अमरावती इथं 44.8, अकोला इथं 43.8 तर बुलढाणा इथं 39.8 अंश सेल्सिअस इतक्या कमाल शुष्क तापमानाची नोंद करण्यात आली.

----------------------------------------